**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA**
**PHONE : EPABX-2609000 GRAM : UNISHIVAJI**
FAX : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333 Affi. Ext. 2609089, 2609136
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४.**
**दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)**
**तार : युनिशिवाजी फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३ व २६९२३३३.**
B Accredited By NAAC (2009)

संलग्नता/टे.१/एमएके/२६९६ दिनांक:- ०२/०६/२०१०

**अत्यंत महत्वाचे**

**प्रति,**
**मा.संस्था अध्यक्ष/ सचिव,**
**सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था**

**विषय:- रिट याचिका क्र.२२१६/२००६ बाबत मा.मुंबई, उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत.**

**संदर्भ:- १) रिट पिटीशन नं.२२१६/२००६ बाबत मा.मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांचे आदेश**
**२) शासन निर्णय क्र.संकीर्ण २००९/(४३५/०९)/विशि-३ दि.३०/०१/२०१०**

महोदय/महोदया,

मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर येथे स्वाधीकारे (sumoto) रिट याचिका क्र.२२१६/२००६ संदर्भ न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार महाविद्यालयातील /मान्यताप्राप्त संस्थेतील प्राचार्य /संचालक आणि शिक्षक यांची रिक्त पदे दि.३१ मे, २००९ पुर्वी भरणे आवश्यक असून प्राचार्यांची रिक्त पदे न भरल्यास संबंधित महाविद्यायलाचे/मान्यताप्राप्त संस्थेचे टप्या-टप्याने प्रवेश प्रतिबंधित करण्याबाबत निर्देश आहेत **असे ही कार्यालयीन पत्र क्र. १) संलग्नता/टे.१/एमएके/१६१ दि.२३/०१/२००९ २) एस.यु./पी.जी./ ॲफि/एसएसपी/१३९५१ दि.१८/०२/२००९ ३)संलग्नता/टे.१/ एमएके/९ दि.२८/०४/२००९ ४)संलग्नता/ टे.१/ एमएके/४/१३४७ दि.०७/०५/२००९ ५) संलग्नता/टे.१/ प्राचार्य/ १३३७ दि.०७/०५/२००९ त्याचप्रमाणे दि.१५/०१/२०१० रोजी महाविद्यालयातील/ मान्यताप्राप्त संस्थेतील प्राचार्यांची/संचालकांची कार्यशाळा आयोजित करुन रिक्त पदे भरण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतरही आपणांस वेळोवेळी लेखी पत्राद्वारे रिक्त पदे भरण्याबाबत कळविण्यात आले आहे.**

न्यायालयाच्या आदेशानुसार जी महाविद्यालये /मान्यताप्राप्त संस्था दि.३१ मे, २०१० अखेर सदरची रिक्त पदे भरु शकणार नाहीत अशा महाविद्यालयांना/मान्यताप्राप्त संस्थाना विद्यापीठाने जून महिन्याच्या पहिल्या सप्ताहात आदेश निर्गमित करुन त्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील प्रवेश शैक्षणिक वर्षाकरीता प्रतिबंधित करावे आणि अशा महाविद्यालयांची /मान्यताप्राप्त संस्थेची नांवे स्थानिक तसेच प्रादेशिक व राज्यपातळीवरील वृत्तपत्रातून प्रसिध्द करावीत. प्रवेश प्रतिबंध करुनही अशा महाविद्यालयात/मान्यताप्राप्त संस्थेतील प्रथम वर्षात महाविद्यालयाने /मान्यताप्राप्त संस्थेने प्रवेश दिल्यास विद्यापीठाने अशा अनाधिकृत विद्यार्थ्यांची पात्रता करु नये किंवा अशा विद्यार्थ्यांना परीक्षेला बसण्यास परवानगी देऊ नये. तसेच आदेश देऊनही महाविद्यालयाने/मान्यताप्राप्त संस्थेने रिक्त पदे भरली नाहीतर पुढील शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम व द्वितीय वर्षासाठी प्रवेश प्रतिबंधित करावेत आणि विद्यापीठाने अशा महाविद्यालयाचे/मान्यताप्राप्त संस्थेचे संलग्नीकरण सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन काढून घ्यावेत/रद्द करावेत असे आदेश दिले आहेत हे आपणांस विदीत आहेच.

वरीलप्रमाणे कळवूनही काही महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थेमार्फत प्राचार्य/संचालकांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही पूर्ण केलेली नाही असे कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे.

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करुनसुध्दा जी महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था प्राचार्य/संचालकांची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करणार नाहीत. त्या महाविद्यालयांची /मान्यताप्राप्त संस्थांची नांवे जून,२०१० च्या पहिल्या आठवडयात स्थानिक वर्तमानपत्रात व विद्यापीठ संकेत स्थळावर विद्यापीठामार्फत प्रसिध्द करुन अशा महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील विद्यार्थ्यांना सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षाकरीता प्रवेश देण्यासाठी प्रतिबंधित केल्याचे प्रसिध्द करण्यात येणार आहे. तसेच प्रवेश प्रतिबंध करुनही अशा महाविद्यालयात /मान्यताप्राप्त संस्थेत प्रथम वर्षात महाविद्यालयाने /मान्यताप्राप्त संस्थेने प्रवेश दिल्यास विद्यापीठ अशा विद्यार्थ्यांची पात्रता करणार नाही व त्या विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता येणार नाही. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची/मान्यताप्राप्त संस्थेची राहील. तसेच सदर महाविद्यालयांच्याबाबतीत /मान्यताप्राप्त संस्थेच्याबाबतीत (Deaffiliation) असंलग्नीकरणाची प्रक्रिया करण्यात येईल.

तेंव्हा आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील रिक्त प्राचार्य/संचालक पदे विद्यापीठ निवड समितीमार्फत भरलेली नाहीत असे महाविद्यालय /मान्यताप्राप्त संस्था उपरोक्त संदर्भीत उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व शासन निर्णयानुसार पुढील कार्यवाहीस पात्र राहतील, याची नोंद घ्यावी.

कळावे.

आपला विश्वासू

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत:-

१) सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तारभवन, मुंबई
२) शिक्षण संचालक, उच्चशिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) सहसंचालक, उच्चशिक्षण कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
४) विशेष कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
५) परीक्षा विभाग,
६) पात्रता विभाग,
७) संलग्नता (युजी आणि पीजी)

D:\Affiliation १\MAK\Vivekanand १२.doc

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com